सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ
# सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१५ - २०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८, ३.९, ३.१२, ३.१३, ३.१४, ३.१५ व ३.१७, यांवरील समितीचा

# तिसरा अहवाल

(दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई

# सार्वजनिक उपक्रम समिती
# (२०१५ - २०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८, ३.९, ३.१२, ३.१३, ३.१४, ३.१५ व ३.१७ यांवरील समितीचा

# तिसरा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**सदस्य**

(२) ॲड. राज पुरोहित, वि.स.स.

(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(४) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(५) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

(६) श्री. आकाश फुंडकर, वि.स.स.

(७) श्री. द्वारम मल्लीकार्जुन रेड्डी, वि.स.स.

(८) श्री. अमित साटम, वि.स.स.

(९) श्री. राजन साळवी, वि.स.स.

(१०) श्री. हर्षवर्धन जाधव, वि.स.स.

(११) श्री. सुनिल राऊत, वि.स.स.

(१२) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

(१३) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१४) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

(१५) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१६) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

(१७) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(१८) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स

(१९) श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.

(२०) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

(२१) ॲड. अनिल परब, वि.प.स.

(२२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

(२३) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

(२४) श्री. अनंत गाडगीळ, वि.प.स.

(२५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. राजेश तारवी, उप सचिव,

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

## सार्वजनिक उपक्रम समिती
## (सन २०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. कल्याणराव काळे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स.

(३) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(४) श्री. जगन्नाथ शेट्टी, वि.स.स.

(५) श्री. रमेशसिंह ठाकूर, वि.स.स.

(६) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(७) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

(८) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

(९) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

(१०) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(११) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(१२) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

(१३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(१४) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.

(१५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(१६) श्री. एकनाथ शिंदे, वि.स.स.

(१७) श्री. महादेव बाबर, वि.स.स.

(१८) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स

(१९) श्री. वसंतराव गिते, वि.स.स.

(२०) श्री. विवेक पाटील, वि.स.स.

(२१) श्री. संजय दत्त, वि.प.स.

*(२२) रिक्त

(२३) श्री. दिपक साळुंखे-पाटील, वि.प.स.

**(२४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

(२५) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

(२६) डॉ. रणजित पाटील, वि.प.स.(निमंत्रित)

(२७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.प.स.(निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. श्रीनिवास जाधव, विशेष कार्य अधिकारी,

श्री. संतोष पराडकर, अवर सचिव,

श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

---

* श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने सदर जागा रिक्त आहे.

**श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने सदरच्या रिक्त जागी श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# अनुक्रमणिका


| अनु-क्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | |
| | **" महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ मर्यादित "** | |
| | **(लेखा परीक्षा अहवाल २००५-२००६)** | |
| (१) | **नाबार्डकडून अनुदान मागण्यास झालेला विलंब** (परिच्छेद क्रमांक ३.८) | १ |
| (२) | **क्षमतेचा वापर** (परिच्छेद क्रमांक ३.९) | ३ |
| (३) | **खाजगी गोदामे भाड्याने घेणे** (परिच्छेद क्रमांक ३.१२) | ८ |
| (४) | **साठवण आकार निश्चिती** (परिच्छेद क्रमांक ३.१३) | ११ |
| (५) | **साठवण आकाराचा थकित** (परिच्छेद क्रमांक ३.१४) | १४ |
| (६) | **शेतकऱ्यांना देण्यात आलेली वटाव सवलत** (परिच्छेद क्रमांक ३.१५) | १९ |
| (७) | **वखारीची देखभाल** (परिच्छेद क्रमांक ३.१७) | २२ |
| (८) | **परिशिष्ट** | २७ |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००५-२००६ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.८, ३.९, ३.१२, ३.१३, ३.१४, ३.१५, व ३.१७ यावरील समितीचा तिसरा अहवाल (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री.सुधीरकुमार गोयल तसेच " महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे " अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री.विश्वास भोसले यांची समितीने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१३ व ९ जून, २०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती पुनम पांडे, प्रधान महालेखाकार (लेखा III), श्री.रविकिरण उबाळे, उप महालेखाकार, तसेच श्री.एस.व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री.सुधीरकुमार गोयल तसेच " महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे " अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री.विश्वास भोसले यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने गुरुवार, दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २३ जुलै २०१५.

**डॉ. सुनिल देशमुख,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

# “ महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ ”

(सन- २००५-२००६)

**एक - नाबार्डकडून अनुदान मागण्यास झालेला विलंब :-**

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.८ “ **नाबार्डकडून अनुदान मागण्यास झालेला विलंब** ” या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, महामंडळाने महाराष्ट्र बँकेकडून रुपये २६.५० कोटी कर्ज घेऊन ७६ गोदामे बांधली होती. (क्षमता १,४९,६४० मे.टन) राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) भांडवली गुंतवणूक अनुदान योजनेन्वये महामंडळाला भांडवली गुंतवणुकीच्या २५ टक्के अनुदान उपलब्ध होणार होते. त्यापैकी निम्मी आगाऊ रक्कम, कर्ज देणाऱ्या बँकेने प्रकल्पचित्रे तथा दावा अर्जासह मान्य केलेले गोदामांचे आराखडे सादर केल्यावर नाबार्डने द्यायला हवी होती. महामंडळाकडून योजना व त्यांचे आराखडे बँकेला सादर करावयास विलंब झाल्यामुळे बँकेने सर्व संकल्पित गोदामांच्या मंजूर केलेल्या आराखड्या/योजनाशिवाय (मार्च,२००३) मध्ये अनुदान मागणीचा दावा सादर केला होता. पुढे ती कागदपत्रे प्रत्यक्षात ऑक्टोबर, २००३ मध्ये सादर करण्यात आली होती. रुपये २.७२ कोटीचे अनुदान ३१ मार्च २००४ मध्ये प्राप्त झाले होते. अशा प्रकारे मंजूर केलेली संकल्पचित्रे आराखडे वगैरे नाबार्डला विलंबाने (मार्च ते ऑक्टोंबर, २००३ असे आठ महिने) सादर केल्यामुळे महामंडळाला बँकेला दरसाल ९.७५ टक्के दराने रुपये १७.६८ लाख इतके टाळता येण्याजोगे व्याजाचे प्रदान करावे लागले होते.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की, जेव्हा जेव्हा महाराष्ट्र बँक/नाबार्ड यांनी जी काही माहिती मागितली होती ती त्यांना शक्यतो तात्काळ पुरविण्यात/सादर करण्यात आली होती. उत्तरांमध्ये मंजूर केलेली संकल्पचित्रे, आराखडे व योजना दाव्यांसोबत सादर न करण्याबाबतच्या कारणाबद्दल मौन पाळण्यात आले होते.

१.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाने महाराष्ट्र बँकेकडून रुपये २६.५० कोटी कर्ज घेऊन ७६ गोदामे बांधली होती. क्षमता १,४९,६४० मे.टन भांडवली गुंतवणूक अनुदान योजनेन्वये महामंडळाला भांडवली गुंतवणुकीच्या २५ टक्के अनुदान उपलब्धीकरिता कर्ज देणाऱ्या बँकेने (महाराष्ट्र बँक) प्रकल्पचित्र तथा दावा अर्जासह मान्य केलेले नाबार्डला सादर केल्यावर नाबार्डने अनुदान द्यायचे असे असताना काही गोदामाचे आराखडे व योजना लोकल बॉडीजकडून मिळवून कागदपत्रांची पूर्तता करून बांधकाम परवाने प्राप्त करून महाबँकेने नाबार्डला मार्च, २००३ मध्ये पाठविले होते. त्यानुसार महाबँकेने त्वरित कार्यवाही करून सदर कागदपत्रे नाबार्डला पाठविली. त्यावर नाबार्डने काही कागदपत्रांची पूर्तता करण्यास महाबँकेस कळविले व त्यानुसार वखार महामंडळाने महाबँकेद्वारा नाबार्डला वेळोवेळी पूर्तता करून दिली. महाबँकेने कर्जाचा पहिला हप्ता दिनांक १० जून २००३ रोजी रुपये ५०.०० लाख दिलेला आहे.

तसेच गोदामांचे परिक्षण मार्केटिंग फेडरेशन वखार महामंडळ व कृषि खाते भारत सरकार यांचेकडून संयुक्तरित्या होत असल्याने त्याकरिता कागदपत्राची पूर्तता करण्यास झालेला विलंब हा विलंब नसून आवश्यक कालावधी आहे असे महामंडळाचे मत आहे.

१.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

१.४ याप्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग, आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.८ मध्ये " नाबार्डकडून अनुदान मागण्यास झालेला विलंब " या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता, त्यानुषंगाने विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, महालेखाकारांचे म्हणणे असे होते की, या प्रकरणांचा पाठपुरावा करून त्या त्या वेळी निधी उपलब्ध करून घ्यावयास पाहिजे होता. वखार महामंडळ गोडाऊन्स बांधण्यासाठी बँकांकडे प्रकरण सादर करीत असते यात दोन टप्प्यात पैसे मिळतात. प्रथम हप्ता १२.५० टक्के आणि दुसरा हप्ता १२.५० टक्के अशा प्रकारे नाबार्डकडून सबसिडी दिली जात असते. बांधकामाचे संकल्पचित्र सादर केल्यानंतर ५० टक्के रक्कम आणि बांधकाम झाल्यानंतर ५० टक्के रक्कम दिली जाते. त्यास्तव सदर प्रकरण महाराष्ट्र बँकेकडे सादर करण्यात आले होते. वर्षभरात सादर झालेली सर्व प्रकरणे एकत्र करून नाबार्डने ३१ मार्च अखेरीस सबसिडी दिली. नाबार्डला वेळोवेळी सांगण्यात आले की, तुमच्याकडे एक गोडाऊनचे प्रकरण आले तर ते प्रोसेस करून त्यासाठीची सबसिडी उपलब्ध करून द्यावी. अशी सबसिडीची प्रकरणे एकत्र करून नाबार्ड सबसिडीची रक्कम रिलीज करीत असावी. नाबार्डकडून सबसिडी मिळण्यास उशीर झालेला आहे. असा विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला.

वखार महामंडळाने सबसिडीचे नाबार्डला पाठवावयाचे प्रस्ताव दिरंगाईने सादर करण्यात आलेले आहेत तसेच सदर प्रकरणे पाठविण्यास वखार महामंडळास आठ महिन्यांचा कालावधी का लागला, आठ महिन्यांच्या कालावधीत वखार महामंडळाची प्रकरणे नाबार्डकडे पाठविली गेली नाहीत. याबाबत समितीस खुलासा करतांना विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, गोडाऊन बांधण्यासाठी जसजशी कागदपत्रे जमा होतात तसतशी कागदपत्रे नाबार्डकडे सादर होत असतात. त्या कामासाठी २५ टक्के रक्कम द्यावयाची आहे. केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याशिवाय सबसिडीची रक्कम नाबार्ड देऊ शकत नाही. याबाबत वखार महामंडळाची प्रकरणे नाबार्डकडे वेगवेगळ्या तारखेला पाठविली गेली आहेत. सर्व सबसिडी नाबार्डकडून ३१ मार्च अखेरीस मिळाली. अशी समितीस माहिती प्राप्त झाली.

बँकेने स्वत:च्या सोयीनुसार, माहे एप्रिल ते मार्च असे लेखा वर्ष देखभाल करावयाचे असते. वखार महामंडळाने बँकेकडे वारंवार प्रस्ताव पाठवूनसुध्दा बँकांनी ते प्रस्ताव नाबार्डकडे उशिरा पाठविले. वखार महामंडळाने बँकेस वेळेवर प्रकरणे सादर केली आहेत. बँकेने ज्या त्रुटी काढल्या होत्या, त्याची पूर्तता करून कागदपत्रे बँकेकडे पाठविलेली आहेत. बँकेने ती प्रकरणे नाबार्डकडे वेळेवर का पाठविली नाहीत. यासंबंधी

बॅकेकडे का विचारणा करण्यात आली नाही ही प्रकरणे नाबार्डकडे पाठवावीत म्हणून वखार महामंडळाने बँकांकडे पाठपुरावा का केला नाही या दोन्ही गोष्टीमुळे वखार महामंडळाचे व्याजाचे नुकसान झालेले आहे. त्या नुकसानीबाबत बँकेला कायदेशीर नोटीस का दिली नाही अशी विचारणा समितीने केली. त्यासंदर्भात विभागाच्या प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, वखार महामंडळाकडून प्रकरणे प्रथम बँकांकडे गेली. बँकांना अशी प्रकरणे नाबार्डकडे पाठविण्याची घाई असते. २५ टक्के सबसिडीची रक्कम त्यांना वेळेवर मिळाली तर बँकांच्या खात्यात आऊटस्टँडींग कमी होते. केंद्र शासनाकडून पैसे प्राप्त झाल्याशिवाय नाबार्ड सबसिडीची रक्कम देऊ शकत नाही अशी नाबार्डची अडचण असते. ते वखार महामंडळाला थेट सबसिडी देऊ शकत नाही. केंद्र शासनाची सबसिडी नाबार्डला आहे आणि नाबार्डची सबसिडी वखार महामंडळाला आहे.

त्यावर वखार महामंडळातर्फे प्रस्ताव देण्यात आला परंतु प्रस्तावासोबत लागणारी जी कागदपत्रे आहेत, ती देण्यामध्ये दिरंगाई झाली. उदा. संकल्पचित्रे, आराखडे, योजना दाव्यासोबत सादर करण्यासाठी दप्तर दिरंगाई झाली आहे, नाबार्डने दिनांक ३१ मार्च रोजी पैसे दिले हा प्रश्न नाही. ती कागदपत्रे देण्यास वखार महामंडळास उशीर झालेला आहे. त्यामुळे नाबार्डकडून उशिरा रक्कम प्राप्त झाली ही वस्तुस्थिती आहे. असे समितीने सांगितले.

**१.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.८ मध्ये " नाबार्डकडून अनुदान मागण्यास झालेला विलंब " याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना वखार महामंडळाने महाराष्ट्र बँकेकडून रुपये २६.५० कोटी कर्ज घेऊन ७६ गोदामे बांधली होती सदर गोदामांसाठी नाबार्डकडून भांडवल गुंतवणूक अनुदान योजनेंतर्गत वखार महामंडळाला भांडवली गुंतवणुकीच्या २५ टक्के अनुदान उपलब्ध होणार होते त्यासाठी वखार महामंडळाने संकल्पचित्रे, आराखडे, योजना दाव्यासोबत विहित कालावधीत महाराष्ट्र बँकेला सादर न केल्यामुळे वखार महामंडळाला २५ टक्के अनुदान मिळण्यास ८ महिन्यांचा विलंब झाल्याचे दिसून येते **भविष्यात पुन्हा अशा प्रकारे बँकांना परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्यास विलंब होऊ नये यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत प्रस्ताव सादर करणेबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी व कामाबाबत अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी जेणे करून शासनाचा तोटा होणार नाही. व याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**दोन - क्षमतेचा वापर :-**

**(६८ केंद्रांमध्ये क्षमतेचा वापर ना नफा ना तोटा बिंदूपेक्षा कमी होता.)**

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.९ "**क्षमतेचा वापर**" या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, मार्च,२००६ अखेर मागील पाच वर्षातील साठवणूक क्षमतेचा वापर खालीलप्रमाणे होता :—

| अ.क्र. | तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ तात्पुरते |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्षअखेर केंद्रांची संख्या | १५६ | १५८ | १६२ | १६४ | १६४ |
| २ | वर्षअखेर असलेली साठवण क्षमता (मेट्रीक टन लाखात) | | | | | |
| | स्वतः च्या मालकीची | ९.४८ | ९.६३ | १०.७५ | १०.९३ | १०.९६ |
| | भाडेतत्वावरील | ०.९४ | ०.४९ | ०.६१ | १.३० | १.१६ |
| | **एकूण** | **१०.४२** | **१०.१२** | **११.३६** | **१२.२३** | **१२.१२** |
| ३ | उपलब्ध असलेली सरासरी साठवण क्षमता (मेट्रीक टन लाखात) | १०.१२ | १०.२३ | १०.८२ | ११.४५ | १२.२८ |
| ४ | वापरलेली सरासरी साठवण क्षमता (मेट्रीक टन लाखात) | ७.५१ | ६.९६ | ६.२० | ७.६५ | ९.८३ |
| ५ | उपलब्ध क्षमतेशी वापराची टक्केवारी | ७४.२१ | ६८.०४ | ५७.३० | ६६.८७ | ८०.०५ |
| ६ | ७५ टक्केपेक्षा कमी क्षमता वापर असलेली केंद्राची संख्या (ना नफा ना तोटा क्षमतेपर्यंत) | ९३ | १०६ | १२९ | ११३ | ६८ |

महामंडळ ७५ टक्के साठवणूक क्षमतेचा वापर म्हणजे क्षमतेचा ना नफा ना तोटा बिंदु वापर समजते. वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन २००१-२००५ या कालावधीत क्षमता वापर ७५ टक्केपेक्षा कमी होता. व तो सन २००५-२००६ मध्ये ८० टक्के इतका वाढला होता. सन २००२-२००४ मध्ये साठवणूक क्षमता वापराचा कल कमी होत गेलेला दिसतो. ज्या वखार केंद्रांची वापर क्षमता ७५ टक्केपेक्षा कमी होती. अशा केंद्रांची संख्या सन २००१-२००२ मध्ये ९३ वरून सन २००२-२००३ मध्ये १०६ व सन २००३-२००४ मध्ये १२९ पर्यंत वाढली होती. परंतु मार्च,२००६ अखेर अशा वखार केंद्रांची टक्केवारी ४१ एवढी जास्त होती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै,२००६) की, सन २००२-२००४ या कालावधीत व्यवसाय खालावण्याची मुख्य कारणे शेजारच्या राज्यांमध्ये वस्तूंच्या वाढलेल्या किंमती, जागतिक स्तरावर खरेदीच्या वेळीच्या

वस्तुंच्या वाढलेल्या जास्त किंमती आणि एकाधिकार कापूस खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र कापूस पणन महासंघाने कापसाची खरेदी खाजगी व्यापाऱ्यांच्या दरापेक्षा कमी दराने केली. परिणामस्वरूप आवश्यक साठवणुकीकरिता वखारीतील गोदामांच्या मागणीत मोठी घट झाली. हे उत्तर समर्थनीय नव्हते. कारण व्यवस्थापनाने बाजाराच्या एकूण बदललेल्या परिस्थितीनुसार कार्यात विविधता आणणे किंवा इतर काही उपाययोजनांची आवश्यकता होती.

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाने कार्यात विविधता आणण्याबाबत वेगवेगळे भरघोस प्रयत्न केले आहेत. ज्या ठिकाणी साठवणुकीकरिता अन्नधान्याव्यतिरिक्त इतर माल परदेशाला जावक होत आहे व त्या ठिकाणी साठवणुकीच्या दृष्टीकोनातून संबंधित मालाची आवक होत नाही, त्या ठिकाणी प्रत्येक केंद्राला तोटा कमी करणे अथवा नफा येणे यासाठी तेथील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करून कमी साठवणूक क्षमतेचे केंद्र जरी असले तरी त्या ठिकाणी ते केंद्र नफ्यात आणण्याचे प्रयत्न झालेले आहेत.

साठवणूक क्षमता वापर वाढविण्याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजनेमध्ये मल्टी नॅशनल कंपनी ज्या बाजारात उतरलेल्या आहेत. उदा. आयटीसी, कारगिल इंडिया लि., अडानी ग्रुप इं. यांच्या मोठ्या प्रमाणात साठवणुकीचे आरक्षण घेण्यात यश आलेले आहे व त्यामुळे कापूस गाठी इ. साठवणुकीचा व्यवसाय जरी कमी झाला तरी ती कमतरता भरून काढण्यासाठी जनरल कस्टम वाढविण्याच्या प्रयत्नांना सदर पाच वर्षे काळात यश आलेले आहे. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | मासिक सरासरी साठवणूक (मे.टन) |
|---|---|---|
| १ | २००१-०२ | २,०१,२४५ मे.टन |
| २ | २००२-०३ | २,४६,१९२ मे.टन |
| ३ | २००३-०४ | ३,७७,६७७ मे.टन |
| ४ | २००४-०५ | ४,४४,५३४ मे.टन |
| ५ | २००५-०६ | ४,०४,४५८ मे.टन |
| ६ | २००६-०७ | ४,४६,४२० मे.टन |

कार्यात विविधता आणण्यासाठी ज्या ठिकाणी व्यवसाय फारच कमी होता अशा केंद्रात इंडस्ट्रीयल वेअरहाऊस या स्वरूपात संपूर्ण गोदाम एकाच कंपनीला ताब्यात देण्यात आलेले आहे, उदा. लोटे परशुराम, वणी भोसरी, चिंचवड इ. सर्व ठिकाणी साठवणूक क्षमता वापर अतिशय अल्प प्रमाणात होत होता, तथापि, आज सदर केंद्राचा साठवणूक क्षमता वापर जास्त झाला आहे.

२.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

२.४ याप्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग, आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी कृषी व पणन विभागाचे

अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.९ मध्ये “क्षमतेचा वापर” या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता, त्यानुषंगाने विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, या परिच्छेदाबाबत महालेखाकारांनी असा लेखा आक्षेप घेतला आहे की, साधारणत: ७५ टक्के क्षमतेचा वापर व्हावा. ७५ टक्के क्षमतेचा वापर झाला तरच ना नफा ना तोटा हेतू साध्य होईल. ७५ टक्क्यांपर्यंत क्षमतेचा वापर न केलेली काही गोडाऊन्सची संख्या दाखविलेली आहे. यामध्ये दोन मुद्दे आहेत. वस्तुच्या स्वरुपाप्रमाणे आणि बॉन्डेड गोडाऊन्स आहेत की ओपन गोडाऊन्स आहेत त्याप्रमाणे क्षमता गाठली जाते. परंतु काही आदिवासी भाग आहे, काही दुर्गम भाग आहे. त्या ठिकाणी शासनाच्या वेगवेगळया योजनांकरिता गोडाऊन्स बांधावेत अशा प्रकारची लोकप्रतिनिधींची मागणी असते आणि याबाबत शासनही आग्रही असते. महालेखाकारांनी जो आक्षेप घेतलेला आहे. त्याबाबतीत काळजीपूर्वक अभ्यास करण्यात येईल. दुसरे कारण असे आहे की, १०० कि.ग्रॅ.बॅग्ज किती राहू शकतात, याच्या आधारावर क्षमता काढली जाते. तिसरे कारण असे आहे की, शेतकऱ्यांचा आणि बिगर शेतकऱ्यांचा जो माल असतो त्यांच्या मालाची स्वतंत्र थप्पी लावून ठेवावी लागते. गोडाऊनमध्ये जागा मोकळी सोडावीच लागते. आपण गव्हाचा विचार केला तर ७५ टक्के गोडाऊनचा वापर निश्चितपणे होतो. आपल्याकडे चांगल्या ठिकाणी असलेले गोडाऊन्स आहेत, तशा गोडाऊन्सची संख्या वाढत चाललेली आहे. पूर्वी २-४ कोटी रुपयांचा नफा होता जो नफा आता ५५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. संगणक प्रणाली सर्व गोडाऊनमध्ये सुरू झाल्यानंतर बराचसा फरक पडेल.

समितीने विचारले की, महामंडळाकडे कोल्ड स्टोअरेज सारखे प्लॅन्ट आहेत काय, शेतकऱ्यांना कोल्ड स्टोअरेजची खरी गरज आहे. वखार महामंडळाने कोल्ड स्टोअरेज सारखे प्लॅन्ट उभारले पाहिजेत. याबाबतीत आपल्या काय योजना आहेत, त्यानुषंगाने विभागाच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, कोल्ड स्टोअरेजचा प्लॅन गेल्या दोन वर्षापासून आम्ही शासनास सादर करीत आहोत. पनवेलमध्ये ५ हजार टनाचे कोल्ड स्टोअरेजचे काम चालू आहे. तसेच रिफर व्हॅनचा देखील प्लॅन तयार केलेला आहे. परंतु आम्हाला दुर्देवाने यासाठी आर.ए.डी.एफ.चे कर्ज मिळत नाही. आम्ही मार्केटमध्ये जाऊन १४ ते १५ टक्क्यांनी कर्ज घेतले तर हे कोल्ड स्टोअरेज आम्हाला परवडणार नाहीत. उत्तर प्रदेश आणि वेस्ट बंगाल या ठिकाणी बटाटा पिकाची शेती मोठ्या प्रमाणावर आहे. या ठिकाणच्या कोल्ड स्टोअरेजचा ९० टक्के वापर बटाट्यासाठी होतो. अशा प्रकारचे गोडाऊन्स फायद्यात आणावयाचे झाल्यास त्यासाठी थोडा कालावधी लागेल.

त्यानुषंगाने समितीने विचारणा केली की, काही खाजगी लोक वखार महामंडळाबरोबर भागीदारी करून कोल्ड स्टोअरेज उभारण्यास तयार आहेत, त्याबाबतीत आपले काय मत आहे, तसेच औरंगाबाद, जालना या ठिकाणी मोसंबी, द्राक्ष, डाळींब यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. या फळांसाठी कोल्ड स्टोअरेज [illegible] प्रयोग करणे गरजेचे आहे. याबाबत विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, कोल्ड स्टोअरेजचा वापर १०० टक्के झाला नाही तर खाजगी व्यक्तीला आणि वखार महामंडळाला देखील तोटा होऊ शकतो.

कमी दराने आम्हाला कर्ज मिळाले तर चांगल्या प्रकारचे कोल्ड स्टोअरेज उभारू शकतो. आपल्याकडील फळे, मिरची इत्यादी वस्तू कोल्ड स्टोअरेजमध्ये स्टोअर करून तो माल स्टॉक मार्केटमध्ये जावा अशा प्रकारची चेन आपल्याकडे ३२ सेंटर्ससाठी १ लाख ५ हजार ठिकाणासाठी आर.आय.डी.एफ. आणि शासनाकडे दोन वर्षांपासून प्रस्तावित केली आहे. परंतु वेअर हाऊसिंगचे लोन मिळण्यासाठी हमी मिळत नाही. इतर राज्यात मात्र या कामासाठी हमी दिली जात आहे. आम्हाला कर्ज घ्यावयाचे आहे. म्हणून आम्ही ८४८ कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला आहे. वित्त विभाग ही नोडल एजन्सी आहे. जर आम्हाला कर्ज घेण्यासाठी हमी दिली तर कोल्ड चेन व गोदामांचे नेटवर्क निर्माण करण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल. परंतु यासाठी आर.आय.डी.एफ.कडून कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

त्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, या संदर्भात काय उपायोजना करणे आवश्यक आहे, त्यानुषंगाने विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, या कामासाठी कर्ज घेण्यासाठी राज्य शासनाने हमी दिली पाहिजे. केंद्र शासनाचा निधी डायरेक्ट वखार महामंडळास दिला गेला पाहिजे. यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. आपण पणन महामंडळातर्फे ग्रेडींग युनिट, पॅकिंग युनिट, कोल्ड स्टोअरेज ४४ ठिकाणी बांधलेले आहेत. जालना येथे कोल्ड स्टोअरेज बांधण्यात आले आहे, परंतु त्याचा वापर खूप कमी प्रमाणात आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एकेक कोल्ड स्टोअरेजची सुविधा आहे. परंतु ते कोल्ड स्टोअरेज चालविण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. इलेक्ट्रीक सिटीचा दर खूप असल्यामुळे कोल्ड स्टोअरेज चालविणे परवडत नाही. असे नमूद करण्यात आले.

**२.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.९ मध्ये “ क्षमतेचा वापर ” याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना असे दिसून आले की, सन २००१-२००५ या कालावधीतील वखार महामंडळाच्या गोदामांची वापर क्षमता ७५ टक्के पेक्षा कमी होती. यावर व्यवस्थापनाने केलेला खुलासा समितीस समर्थनीय वाटत नाही, कारण एकूण बदललेल्या परिस्थितीनुसार वखार महामंडळाने कार्यात विविधता आणणे किंवा इतर काही उपाययोजना करणे आवश्यक होते. **जसे की साठवण क्षमतेत वाढ होण्यासाठी वखार महामंडळाने राज्यामध्ये ज्या ठिकाणी ठराविक शेतमालाचे उत्पन्न भरघोस प्रमाणात आहे त्या ठिकाणच्या तालुक्यांमध्ये शेतमाल साठवणुकीसाठी व शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळण्याच्या दृष्टीकोनातून कोल्ड स्टोअरेजची उभारणी करण्यात यावी यासाठी आर.ए.डी.एफ. या संस्थेकडून बाजारातील वित्तीय संस्थेपेक्षा अत्यल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध होऊ शकते सदर कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून राज्य शासनाची हमी आवश्यक असते म्हणून समितीतर्फे शिफारस करण्यात येत आहे की, राज्य शासनाने वखार महामंडळामार्फत कोल्ड स्टोअरेज उभारण्यासाठी आर.ए.डी.एफ. कडून कर्ज मिळावे म्हणून हमी द्यावी तसेच कोल्ड स्टोअरेजकरिता महावितरणमार्फत वीज पुरविण्यात येते त्या वीजेच्या दरामध्ये सबसिडी देण्यात यावी जेणेकरून कोल्ड स्टोअरेजचा देखभाल खर्च कमी होऊ शकेल व शेतकऱ्यांना कोल्ड स्टोअरेजमध्ये शेतमाल ठेवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे ज्यामूळे शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळू शकेल. याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी.**

**तीन - खाजगी गोदामे भाड्याने घेणे :-**

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ " **खाजगी गोदामे भाड्याने घेणे** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले, महामंडळाने सन २००१-२००६ या कालावधीत साठवणुकीकरिता आलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ०.४९ लाख व १.३० लाख मेट्रीक टन क्षमता असलेली खाजगी गोदामे भाड्याने घेतली होती. भाड्याने घेतलेल्या खाजगी गोदामांमध्येच नवी वखार केंद्रे चालू करण्यात आली होती. लेखापरीक्षणात भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामांच्या बाबतीत पुढील त्रुटी आढळून आल्या.

- भाड्याने घेऊन चालविलेली सिल्लोड (मे, २००१) नागभीड (डिसेंबर, १९९८) व तळोधी, बेलापूर (डिसेंबर,१९९८) ही तीनही केंद्रे भाडेतत्वावर घेतलेल्या दिवसांपासून तोट्यात असतानाही चालविली जात होती. महामंडळाने त्यांचे भाडेतत्वावरील कार्यचालन ऑक्टोबर,२००४ मध्ये थांबविल्यानंतर ती केंद्रे बंद करण्यात आली होती. या केंद्रांमुळे सन २००१-२००६ या कालावधीत रुपये १३.७६ लाख इतका तोटा झाला होता. जर ही भाड्याची केंद्रे योग्यवेळी सोडण्याचा निर्णय घेतला असता तर झालेला तोटा टाळता येणे शक्य होते.
- किती गरज आहे व आर्थिकदृष्ट्या कितपत व्यवहार्य ठरतील याचा विचार करूनच व योग्य नियोजन करून खाजगी गोदामे भाड्याने घेण्याचा निर्णय घेणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, खाजगी गोदामे ॲडव्हॉक तत्वावर व अपारदर्शीपणे घेतली होती. भाड्याचे स्पर्धात्मक दर मिळविण्याकरिता महामंडळाने निविदा/देकार मागविले नव्हते. त्याऐवजी ज्या खाजगी गोदाम मालकांचे अर्ज आले होते. त्या आधारावरच गोदामे भाड्याने घ्यायचा निर्णय घेण्यात आला.
- सरासरी क्षमतेचा पूर्णपणे या आधारावर स्वतःची ३० वखार केंद्रांमधील क्षमता एकूण साठवणुकीची गरज भागविण्यास पुरेशी होती असे असतानाही सन २००१-२००६ या कालावधीत तीन महिने ते चार वर्षे या मुदतीत ६१,५४६ मे.टन अतिरिक्त साठवण क्षमतेची गोदामे भाड्याने घेण्यात आली होती.
- ३० केंद्रांच्या लेखापरीक्षण छाननीत असे आढळून आले की, सन २००४-२००६ या कालावधीत क्षमतेचा वापर २ ते १२ महिन्यांपर्यंत स्वतःच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा कमी होता. म्हणून या कालावधीत अतिरिक्त क्षमता भाड्याने घेण्याबाबत कोणतेही समर्थन नव्हते.

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, नागभीड, तळोधी, बेलापूर या ठिकाणची वखार केंद्रे आदिवासी भागात असून शासनाच्या निर्देशाप्रमाणे चालू करण्यात आली होती व प्रामुख्याने भात शेती उत्पन्नाची त्या भागात साठवणुकीची सोय नसल्याने शासनाने महामंडळाला विशेष आदेश दिल्यानंतरच उघडण्यात आली होती. व त्या भागात इतर कोणतीही साठवणुकीची सोय उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांचा माल उदा. पॅडी इ. बाबत जास्त तोटा होऊ नये या दृष्टीकोनातून केंद्र उघडण्यात आले होते. परंतु ३ ते ४ वर्षे सातत्याने प्रयत्न करूनही जेव्हा असे लक्षात आले की, सदर केंद्र काहीही केले तरी नफ्यामध्ये येऊ शकत नाहीत तेव्हा शेवटी ही केंद्रे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

भाड्याची गोदामे घेताना सदर गोदामाच्या होणाऱ्या भाड्यापेक्षा त्यापासून मिळणारे उत्पन्न जास्त मिळेल हे बघूनच गोदाम भाड्याने घेण्यात येते. खाजगी गोदाम भाड्याने घेतेवेळी महामंडळाच्या स्वतःच्या गोदामामध्ये जागा नसेल व एखाद्या ठेवीदाराकडून ताबडतोब जागेची मागणी असेल तर निविदा व देकार मागवून भाड्याची गोदाम ठरविणे प्रत्यक्षात शक्य नसते, कारण निविदा मागविणे व गोदामाकरिता स्पर्धात्मक दर ठरविणे यामध्ये बराच कालावधी जाण्याची शक्यता असते व सदर कालावधीमध्ये येणारा व्यवसाय महामंडळाकडून जाण्याची शक्यता असते, त्यामुळे महामंडळाकडून खाजगी गोदामे भाड्याने घेण्यात येतात. लेखा परिच्छेदात उल्लेख केलेल्या वखार केंद्रावर स्वतःच्या गोदामाच्या क्षमतेपेक्षा वापर कमी होता, तरीही गोदामे भाड्याने घेण्यात आली आहेत याबाबत असे सादर करण्यात येते की, सदर गोदामांमध्ये वर्षातील काही कालावधीमध्ये/ बिगर हंगाम कालावधीमध्ये कमी साठवणूक क्षमता असते, त्या कालावधीमध्ये सदर गोदाम सोडणे व हंगामी कालावधीमध्ये गोदाम भाड्याने परत घेणे शक्य नसते. कारण सदर गोदाम Peak Season मध्ये आहेत त्याच दरामध्ये भाड्याने उपलब्ध होऊ शकत नाहीत, त्यामुळे नंतर मिळणारा महामंडळाचा व्यवसाय जाण्याची शक्यता असते व गोदाम, इतर खाजगी संस्था त्यावेळी ते गोदाम भाड्याने घेणेची शक्यता जास्त/ प्रचंड असते व त्याचा परिणाम महामंडळाच्या व्यवसायावर प्रत्यक्ष पडतो.

सन २००१-२००६ कालावधीसाठी एकूण ६१,५४६ मे.टन अतिरिक्त साठवणूक क्षमता भाड्याने घेण्यात आली होती व त्या ठिकाणी प्रत्येक केसमध्ये जेव्हा गोदाम भाड्याने घेण्यात आले होते, तेव्हा स्वतःचे गोदामात जागा उपलब्ध नव्हती, असे एकही उदाहरण नाही की ज्यामध्ये गोदाम भाड्याने घेतेवेळी स्वतःचे गोदामात जागा शिल्लक होती. एखादे गोदाम भाड्याने घेतल्यानंतर साठवणूक क्षमतेचा वापर कमी जास्त होऊ शकतो, कारण कोणता माल केव्हा आणि कोणत्या गोदामातून स्वतःचे अथवा भाड्याचे गोदामातून जाईल हे सांगता येत नाही. तरी महामंडळाने प्रत्येक ठिकाणी दूरदृष्टी ठेवून, ३/४ महिन्यांसाठी भाड्याने घेतलेल्या गोदामाचा क्षमता वापर कमी झाला तरी पिक सिझनमध्ये पुन्हा त्याचा वापर होतो व झालेला सुध्दा आहे. याच हेतूने भाड्याने गोदाम घेतलेले आहे. तसेच २ ते १२ महिन्यांपर्यंत स्वतःच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा कमी क्षमता वापराचा उल्लेख सन २००४-२००६ या कालावधीत केलेला आहे त्याचे उत्तर वरीलप्रमाणे आहे.

३.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

३.४ या प्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.१२ मध्ये " खाजगी गोदामे भाड्याने घेणे ", भाड्याने घेऊन चालविलेली सिल्लोड, नागभीड व तळोधी, बेलापूर येथील तीनही केंद्रे भाडेतत्वावर घेतलेल्या दिवसापासून तोट्यात असतानाही तो सोडण्याचा निर्णय घेण्यासाठी महामंडळाला ३ ते ४ वर्षे का लागली तसेच भाड्यानी घेतलेली गोदामे कुठे आहेत या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता, त्यासंदर्भात विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, फक्त ५ ठिकाणीच भाड्याने घेतलेली

गोदामे आहेत. महामंडळाची सर्व ठिकाणी गोदामे आहेत. ऑडिट झाले तेव्हापासून २ लाख ३३ हजार मेट्रिक टन इतकी अतिरिक्त क्षमता केली आहे. औरंगाबाद येथील लासूर, अमरावती येथील शेगाव व रिसोड, मुंबई येथील कळंबोली, नागपूर येथील भंडाराघे, वडसा आणि पुणे येथील भोसरी या ठिकाणी भाड्याने घेतलेली गोदामे आहेत. महसूल मिळू शकला तर आम्ही भाड्याने घेतलेल्या ठिकाणी देखील गोदामांचे काम करणार आहोत.

त्यानुषंगाने समितीने विचारले की, आपण भाड्याने घेतलेली गोदामे तोट्यामध्ये आहेत काय त्यासंदर्भात विभागाच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की खाजगी गोदामांची क्षमता ७९ टक्के आहे तर महामंडळाच्या गोदामांची क्षमता ८० ते ९५ टक्के आहे. महामंडळाचे गोदाम भरल्यानंतर दुसरे गोदाम घेते. सन २००८ मध्ये १६८ ते १७० लाख क्विंटल कापसाची खरेदी केली होती. त्यावेळी आपल्याला २५० गोदामे भाड्याने घ्यावी लागली होती. त्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, महालेखाकारांचे म्हणणे आहे की, आपण अर्ज मागवून गोदाम घेतले, निविदा का मागविल्या नाहीत, तसेच महामंडळ या संदर्भात धोरणात्मक निर्णय का घेत नाही मुंबईमध्ये गोदाम घ्यायचे असेल तर किती दर द्यावा आणि नागपूरमध्ये गोदाम घ्यायचे असेल तर किती दर द्यावा, त्यानुषंगाने विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महामंडळाला कोणत्या ठिकाणी अतिरिक्त गोदामांची गरज भासेल हे सांगता येत नाही कधी कधी गोदामांची अचानक गरज भासते. त्यावेळी त्या ठिकाणी असलेल्या गोदामाचा दर त्यांच्याकडून ठरविला जातो नंतर गोदाम भाड्याने घेण्यात येते. दर परवडत नसेल तर गोदाम घेत नाही. गोदाम भाड्याने घेतलेल्या ठिकाणी तोटा होत नाही, हे महामंडळ पाहते. महामंडळाकडून या संदर्भात धनादेशाद्वारे रक्कम अदा करण्यात येते. त्यामुळे इतर प्रश्न उद्‌भवत नाहीत. त्यानुषंगाने समितीने नमूद केले की, आपल्याकडे कालावधी मर्यादित असतो. खाजगी गोदामे भाड्याने घेण्याच्या निविदा प्रक्रियेला ६ महिने लागतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा माल वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही महामंडळ ई-वखार गोदाम योजनेसंदर्भात नाबार्ड मार्फत लोकांना सतर्क करण्याची गरज आहे. अशी समितीने सूचना केली.

**३.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.१२ मध्ये " खाजगी गोदामे भाड्याने घेणे " याबाबत महामंडळाने सन २००१-२००६ या कालावधीत साठवणुकीकरिता आलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ०.४९ लाख व १.३० लाख मेट्रीक टन क्षमता असलेली खाजगी गोदामे भाड्याने घेतली होती. भाड्याने घेतलेल्या खाजगी गोदामांमध्ये नवी वखार केंद्रे चालू करण्यात आली होती. लेखापरीक्षणात भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामांपैकी सिल्लोड, नागभीड, व तळोधी, बेलापूर ही तीनही केंद्रे भाडेतत्वावर घेतलेल्या दिनांकापासून तोट्यात असतानांही कार्यरत होती आणि ती ऑक्टोबर, २००४ मध्ये भाडेतत्व बंद केल्यानंतर सन २००४ मध्ये सदर केंद्रे बंद करण्यात आली होती. तथापि, या कालावधीत महामंडळास रुपये १३.७६ लाख इतका तोटा झाला होता आणि ही केंद्रे जर योग्यवेळी बंद केली असती तर वर उल्लेखित तोटा टाळता आला असता सदर गोदामे विशिष्ट उद्देश्याने व अपारदर्शीपणे घेतली होती त्याबाबत निविदा न मागविता गोदाम मालकांनी महामंडळाकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली होती असे महालेखापरीक्षकांचे आक्षेप आहेत.

त्यानंतर समितीने घेतलेल्या साक्षीच्या वेळी महामंडळ महालेखापालांनी घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने समितीस महामंडळाचे प्रतिनिधी समाधानकारक खुलासा करू शकले नाहीत. **खाजगी गोदामे भाड्याने घेऊन ती केंद्रे भाडेतत्वावर घेतलेल्या दिवसापासून तोट्यात असतांनाही ३ ते ४ वर्षे का चालविण्यात आली यासंदर्भात महामंडळाच्या प्रतिनिधींनी समितीस केलेला खुलासा समर्थनीय वाटत नाही गरज भासल्यास खाजगी गोदामे भाड्याने घेण्यापूर्वी खाजगी गोदामाचे भाड्याचे दर संयुक्तिक असावेत ज्यामुळे शासनाचे नुकसान होणार नाही यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे तसेच ई-वखार गोडाऊन स्कीमबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्याची व सदर योजना अधिकाधिक लोकाभिमुख होण्याची अत्यंत गरज आहे. व याप्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी.**

**चार - साठवण आकार निश्चिती :-**

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ "**साठवण आकार निश्चिती**" या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, साठवणूक आकार हेच महामंडळाच्या महसूली प्राप्तीचे मुख्य स्त्रोत आहे. महामंडळाने मागील १० वर्षात साठवणूक दरात केलेली सुधारणा खालीलप्रमाणे होती :-

| यादी अनुक्रमांक | लागू झालेली तारीख | दरात केलेली वाढ (टक्के) | दर सुधारणेतील मधला कालखंड (महिने) |
|---|---|---|---|
| ४२ | १ जानेवारी १९९६ | ३३ | २६ |
| ४३ | १ जानेवारी १९९७ | १३-१५ | १२ |
| ४४ | १ जून १९९८ | १०-१५ | १७ |
| ४५ | १ एप्रिल २००० | २० | २२ |
| ४६ | १ एप्रिल २००५ | ५-१५ | ६० |

प्रतिवर्ष प्रत्येक टनांचा सरासरी खर्च जो सन २०००-२००१ मध्ये रुपये ४९६.१८ इतका होता तो, सन २००४-२००५ मध्ये रुपये ७४२.७९ एवढा हळूहळू वाढला होता. महामंडळाने वरील कालावधीत साठवणूक दरपत्रकांत एका ठराविक कालखंडानंतर हळूहळू सुधारणा केली नव्हती. फक्त एप्रिल, २००५ मध्ये दरपत्रकांत सुधारणा करण्यात आल्यामुळे सन २००३-२००४ मध्ये तोट्यात असलेल्या ५५ वखार केंद्रांमध्ये घट होऊन ती सन २००५-२००६ मध्ये ११ इतकी कमी झाली होती.

एप्रिल, २००५ पूर्वी साठवणूक केंद्रांचे वर्गीकरण सरासरी दराचे व प्रमाणित दराचे अशा दोन प्रकारात केले जात होते. परंतु एप्रिल,२००५ पासून साठवणूक केंद्रांचे खालील चार प्रकारात वर्गीकरण केले जात होते :—

ऐ+ - उच्च प्रमाणित स्तर असलेले (नवी मुंबईमध्ये).

ऐ - प्रमाणित स्तर असलेले.

बी - सर्वसाधारण स्तर असलेले.

सी - निम्न स्तर असलेले.

वखार केंद्रांचे वर्गीकरण करण्यात आले होते तरी गोदामे अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या फायद्याचे वजन दरपत्रकात देण्यात आले नव्हते.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै,२००६) की, दरपत्रक ठरविताना अनेक घटक कारणीभूत असतांना शहराची व्यापकता, बाजारात जीवनावश्यक वस्तुच्या होणाऱ्या उलाढालीचे प्रमाण व त्याप्रमाणांतील मागणी व दर तसेच इतर व्यापारी संस्थांनी ठरविलेले दर हे सुध्दा विचारात घेऊन साठवणुकीचे दरपत्रक निश्चित केले होते. तसेच वर्गीकरणाच्या पद्धतीचा आढावा घेण्यात येईल असे व्यवस्थापनाने आश्वासन दिले होते.

४.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, माहे एप्रिल,२००५ मध्ये साठवणूक आकार निश्चिती करतांना वखार केंद्रांचे करण्यात आलेले वर्गीकरण योग्य असल्यामुळे सदर वर्गीकरण त्याचप्रमाणे कायम ठेवण्यात आलेले आहे. दर ठरविताना उल्लेख केलेले घटक उदा. सध्याची व्यापकता, बाजारभाव, वस्तुंच्या उलाढालीचे होणारे प्रमाण व त्या प्रमाणातील मागणी व दर तसेच इतर व्यापारी/संस्थांनी ठरविलेले दर, तसेच इतर शेजारी असलेले खाजगी गोदामाचे दर व इतर वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशनचे दर या सर्व दरांचा तूलनात्मक अभ्यास करूनच व वर्गीकरणाच्या पद्धतीचा आढावा घेऊनच ऐ+, ऐ, बी, सी या श्रेणीमध्ये साठवणूक भाड्याचे दर ठरविण्यात आलेले आहेत.

४.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

४.४ याप्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग, आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ९ जून २०१५ रोजी कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.१३ मध्ये " साठवण आकार निश्चिती " या आक्षेपासंदर्भात शासकीय गोदामांचे दर वर्षानुवर्षे अद्यावत केले जात नाहीत. बाजारपेठेतील इतर खाजगी गोदामांमधील भाव व शासकीय गोदामांमधील भाव यांच्यामध्ये फरक असतो. खाजगी गोदामांमधील सुविधांमध्ये फरक असतो. दर आणि सुविधा या दोन्ही बाबी अद्यावत केल्या तर जास्तीत जास्त ग्राहक शासकीय गोदामांकडे आकृष्ट होतील. वर्षानुवर्षे शासकीय गोदामांच्या भाड्याच्या दरामध्ये वाढ न केल्यामुळे महाराष्ट्र वखार महामंडळाचे नुकसान झालेले आहे. आक्षेप परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, २६-२६ महिने शासकीय गोदामांच्या भाड्याचा दर अद्यावत केलेला नाही. शासकीय गोदामांच्या भाड्याचा दरही बाजारपेठ व इतर खाजगी गोदामांच्या भाड्याच्या दराप्रमाणे हंगामानुसार कमी

जास्त करणे अत्यावश्यक आहे. बाजार स्थिती आणि मागणी यांचा तुलनात्मक अभ्यास करून दरनिश्चिती होणे आवश्यक आहे. या समितीच्या म्हणण्यावर, विभागीय सचिवांनी सन २००१ मध्ये शासकीय गोदामांचा भोगवटा ८७ टक्के इतका असतांना दरवाढ करण्यात आली होती. ही दरवाढ झाल्यानंतर लगेच शासकीय गोदामांचा भोगवटा ७४ ते ५० टक्क्यांपर्यंत घसरत राहिला. शासकीय गोदामांकडचा व्यापार खाजगी गोदामांकडे वळला, कारण त्यावेळी खाजगी गोदामांचा दर शासकीय गोदामांच्या तुलनेने कमी होता. सन २००१ च्या दरवाढीनंतर महामंडळाने दर वाढीसंदर्भात चार वर्ष वाट बघण्याचा निर्णय घेतला. सन २००४ नंतर ते सन २०१४ पर्यंत प्रत्येक वर्षी शासकीय गोदामांच्या भाडयाच्या दरामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. सन २००१ नंतर स्पर्धेमध्ये टिकण्याकरिता महामंडळाने दरवाढ करण्याचे थांबविलेले होते, सन २००५-२००६ मध्ये महामंडळाने ७.५ टक्के इतकी दरवाढ केली होती. सन २००६-२००७ मध्ये दहा टक्के वाढ करण्यात आली होती. अशा प्रकारे आतापर्यंत प्रत्येक वर्षी शासकीय गोदामांच्या भाडयामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. शासकीय गोदामांची भोगवटा क्षमता ५०-५७ टक्क्यांपर्यंत खाली घसरली होती असा खुलासा केला.

शासकीय गोदामांमधील अंतर्गत देखभाल दुरूस्ती व सुविधांवर ४९३ कोटी रुपयांपासून ७४२ कोटी रुपयांवर खर्च करण्यात येऊन देखील दरवाढ करण्यात आली नव्हती, यामुळे वखार महामंडळाचे नुकसान झाले होते. गोदामांच्या देखभाल दुरूस्तीचे व सुविधांचे खर्च वाढले असतांनाही दरवाढ न करण्यात आल्याने तसेच महामंडळाने गोदामांच्या भाडयाच्या दराबाबत ठराविक कालखंडानंतर सुधारणा केल्यामुळे महामंडळाला तोटा सहन करावा लागला. याबाबत समितीस खुलासा करतांना लेखापरीक्षक यांच्या परिच्छेदाप्रमाणे ते बरोबर आहे. परंतु दरवाढ केली असती तर गोदामांचा भोगवटा कमी झाला असता. गोदामांच्या क्षमतेचा वापर जास्तीत जास्त होण्याकरिता तसेच, इतर खाजगी गोदामांप्रमाणे शासकीय गोदामांचा व्यापार यावा, हाच या दरवाढ स्थगितीचा उद्देश होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासकीय गोदामांच्या भाडयाचे दर हंगामाप्रमाणे का ठरविले जात नाहीत, इतर खाजगी गोदामांच्या भाडयाचे दर हंगाम व मागणी याप्रमाणे कमी जास्त केले जातात. या महालेखाकार प्रतिनिधींच्या म्हणण्यावर वखार महामंडळाच्या गोदामांच्या भाडयाचे दर वाढविण्याकरिता वापराची क्षमता प्रमाण पाहिल्यानंतरच बोर्ड मान्यता देते. मागणी आणि पुरवठा यांच्या स्थितीनुसार आणि वापरण्याच्या क्षमतेच्या हिशोबाने शासकीय गोदामांच्या भाडयाचे दर निश्चित केले जातात. सन २००५ नंतर मार्केट मध्ये इतर गोदामांच्या भाडयाचे दर व मार्केटमध्ये गोदामांकरिता मागणी या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर शासकीय गोदामांचे दर आतापर्यंत दरवर्षी थोडया थोडया प्रमाणात वाढविण्यात आलेले आहेत. असे विभागीय सचिवांनी नमूद केले. महाराष्ट्रात सर्वत्र शासकीय गोदामांच्या भाडयाचे दर सारखेच आहेत काय या समितीच्या प्रश्नाबाबत खुलासा करतांना विभागीय सचिवांनी संपूर्ण महाराष्ट्रातील विविध ठिकाणी असलेल्या शासकीय गोदामांच्या भाडयाचे दर हे तेथील परिस्थिती, बाजार स्थिती, क्षमता व वापर क्षमता, मागणी, पुरवठा आदी घटकांप्रमाणे वेगवेगळे आहेत. तसेच, त्यामध्ये वखार महामंडळाने पाच प्रकारची प्रतवारी केलेली आहे. रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेले गोदाम, व एफसीआयकडून जादा मागणी असलेले गोदाम याप्रमाणे सर्व प्रकारच्या गोदामांच्या

भाडयाचे दर निश्चित केले जातात. तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या गोदामांच्या भाडयाचे दर हे वेगवेगळे असतात. मनमाड आणि गडचिरोली येथील गोदामांच्या भाडयाच्या दरामध्ये निश्चितच फरक असणार आहे असे नमूद केले.

समितीने राज्य वखार महामंडळाच्या गोदामांना आणि इतर खाजगी गोदामांना कोणत्या महिन्यामध्ये कोणत्या भावाने मागणी आहे, वर्षातील बारा महिन्यांमध्ये गोदामांची जास्तीत जास्त काढलेली भोगवटा सरासरी शेतक-यांच्या मागणीप्रमाणे व वर्षभरातील खाजगी व शासकीय गोदामांची उपलब्धता व भाड्याचा दर यांचा तुलनात्मक अभ्यास करूनच महामंडळाने सन २००५ ते सन २०१४ पर्यंत वाढविलेल्या भाड्याचा तुलनात्मक अभ्यासाची माहिती समितीला उपलब्ध करून देण्याचे समितीने विभागीय सचिवांना सांगितले.

**४.५ अभिप्राय व शिफारस :-**

**भारताचे** नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.१३ मध्ये " साठवण आकार निश्चिती " याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना महाराष्ट्र वखार महामंडळाने त्यांच्या गोदामांचे दर मागील कित्येक वर्षापासून अद्ययावत केलेले नव्हते, तसेच बाजारपेठेतील खाजगी वखारी तसेच शासकीय वखारी यांच्या दरामध्ये फरक असल्यामुळे तसेच खाजगी गोदामांमध्ये उत्तम आधुनिक सुविधा असल्यामुळे ग्राहकांचा कल खाजगी गोदामांकडेच जास्त असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली होती. **त्यामुळे शासकीय गोदामांमधील दरांचा तुलनात्मक अभ्यास करूनच दरांमध्ये सुधारणा करण्यात यावी तसेच शासकीय गोदामांमध्ये ज्या सोयी-सुविधा पुरविण्यात येतात त्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुरविण्यात याव्यात जेणेकरून गोदामांच्या देखभाल व दुरूस्तीवर जास्त खर्च होणार नाही आणि शेतकरी खाजगी गोदामांऐवजी शासकीय गोदामांना प्रथम प्राधान्य देतील व शासकीय गोदामांचा भोगवटा बाराही महिने जास्तीत जास्त राहील यादृष्टीने वखार महामंडळाने व पणन विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**पाच - साठवण आकाराचा थकित :-**

**५.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१४ " **साठवण आकाराचा थकित** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, साठवणूक आकारातून प्रतिवर्षी प्राप्त झालेला महसूल व त्याची थकबाकी खालीलप्रमाणे होती :—

| तपशिल | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ (तात्पुरते) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| साठवण आकारातून प्राप्त झालेला वार्षिक महसूल | ३,४४४.०४ | ३,२२१.२५ | ३,००५.८७ | ४,१८५.४५ | ४,८९९.१८ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिमाह सरासरी महसूल | २८७.०० | २६८.४४ | २५०.४९ | ३४८.७९ | ४०८.२६ |
| वर्ष अखेर येणे असलेला साठवणूक आकार | १,११३.९७ | १,२३२.९३ | १,३०३.६३ | १,६७७.८८ | १,२९२.९७ |
| थकित महसूलाचा महिन्यांचा कालावधी | ३.८८ | ४.५९ | ५.२ | ४.८१ | ३.१६ |
| खाजगी पक्षकारांकडून येणे असलेला साठवण आकार | ४७५.६७ | ५७९.७२ | ७७३.८२ | ९२३.५७ | ५३३.२० |
| एकूण येणे असलेल्या रकमेशी खाजगी पक्षकारांच्या येण्याची टक्केवारी | ४२.७० | ४७.०२ | ५९.३६ | ५५.०४ | ४१.२४ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, तीन ते पाच महिन्यांच्या महसूलाइतकी रक्कम थकीत होती. त्यापैकी ४० टक्के महसूल खाजगी पक्षकारांकडून येणे होता. तसेच मार्च,२००५ रोजी येणे असलेल्या रुपये ९.२४ कोटी महसूलाचे विश्लेषण केले असता खालील बाबी निर्दर्शनास आल्या :-

- एकूण येणे असलेल्या रकमेच्या ९० टक्के रक्कम ( ८.३१ कोटी ) ज्या गिऱ्हाईकांनी आपला माल गोदाम साठवण पावतीच्या ( डब्ल्यूएचआर ) तत्त्वावर ठेवला अशांकडे होती. अशा ऋणकोंचा आढावा घेतला असता असे दिसून आले की, निवडलेल्या १५ वखार केंद्रांपैकी १४ मध्ये १९९१ मध्ये साठविलेला मागील कालावधीचा माल या गिऱ्हाईकांनी आत्तापर्यंत उचलला नव्हता या साठवण केंद्रांकडून येणे असलेली रक्कम रुपये ५९.४३ लाख होती व ती ३१ डिसेंबर, २००४ पर्यंत दिलेल्या १,८१८ डब्ल्यूएचआरच्या बाबत होती. वस्तूत: अशा डब्ल्यूएचआर पावतीच्या आधारे गिऱ्हाईकांचा माल फक्त तीन महिने पर्यंतच साठविण्याकरीता स्विकारला होता. तीन महिन्यांत जर माल उचलला गेला नाही तर पूर्ण मुदतीचे भाडे वसूल करूनच तो परत करावयाचा होता. परंतू सध्या अस्तित्त्वात असलेल्या पध्दतीनुसार तीन महिन्यांच्या मुदतीचे भाडे वेळोवेळी वसूल करण्याबाबत खात्री देता येत नव्हती किंवा अशा मालाची ठरलेल्या तीन महिन्यांच्या मुदतीनंतर विल्हेवाट लावून येणे वसूल करण्याची पद्धत विहित करण्यात आली नव्हती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की, या अगोदर दर तीन महिन्यांनी भाडे वसूल करण्याचे प्रयत्न केले होते व त्या अनुषंगाने मुख्य कार्यालयाने निर्देश सुद्धा जारी केले होते. परंतू कार्यक्षेत्रांमध्ये

उद्‌भवणाऱ्या अडचणींमुळे त्यांची अंमलबजावणी करता आली नव्हती. हे उत्तर समर्थनीय नव्हते कारण, महामंडळाने साठवणूक भाडे वेळेवर वसूल करण्याची सुयोग्य व प्रभावी कार्यपद्धतीबाबत खात्री करून घेतली नव्हती. महामंडळाने ऐआरसीपीएसई च्या बैठकीत या प्रकरणात विशेष लक्ष घालण्याचे आश्वासन दिले होते.

**(रुपये ७६.५१ लाखांचे येणे खाजगी संस्थांकडून वसूल करण्यात आले नव्हते. कोणताही विलंब आकार आकारण्यात आला नव्हता.)**

ज्या खाजगी पक्षकारांनी गोदामातील जागा साठवणूकीसाठी आरक्षित केली होती त्यांच्याकडे रुपये ७६.५१ लाख इतकी रक्कम थकीत होती. अशा प्रकरणात जरी प्रचलीत पद्धतीनुसार गिऱ्हाईकांनुसार प्रत्येक महिन्याचा साठवणूक आकार वसूल करणे आवश्यक होता तरी तो वसूल करण्यात आला नव्हता. पुढेही असे निदर्शनास आले होते की, तीन महिन्यांपेक्षा अधिक येणे रक्कम बाकी असतानाही २२ पक्षकारांना (बाकी रुपये ३७.१७ लाख साठवणूक) आकारापोटी थकित बाकी वसूल न करताच माल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात आली होती. तसेच भाडे भरण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या पक्षकारांवर वार्षिक १८ टक्के दराने रुपये १९.७९ लाख एवढा विलंब आकार देखील लागू करण्यात आला नव्हता.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै,२००६) की, विलंब आकारासह सर्व थकबाकी वसूल करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. लेखापरीक्षण विश्लेषणामध्ये पुढे असेही निदर्शनास आले की,

- एका प्रकरणात ऑगस्ट,२००२ या महिन्याचे देयक (गुजरात राज्य खते आणि रसायने मर्यादित) लेखापरीक्षकांनी मे,२००६ मध्ये निदर्शनास आणून देईपर्यंत पाठविले नव्हते.
- एफसीआय वेगवेगळ्या केंद्रांमधील निश्चिती क्षमतेच्या जागा अन्नधान्य साठविण्याकरिता आरक्षित करते, अशा आरक्षित जागांच्या परिमाणांची मासिक देयके मुख्य कार्यालयांकडून तयार केली जातात. परंतू अशा, आरक्षित केलेल्या जागांचा तपशिल महामंडळाच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध असतानाही मासिक देयके मंडळाच्या बिलींग व रिकव्हरी युनिटने एक ते नऊ महिने विलंबाने पाठविली होती.

**(एफसीआय आणि इतर खाजगी पक्षकारांना देयके पाठविण्यास विलंब केल्यामुळे महसूल सुद्धा विलंबाने प्राप्त झाला होता.)**

- ज्या वखार केंद्रामध्ये आरक्षित केलेल्या जागेपेक्षा अतिरिक्त अन्नधान्य साठविले होते. त्याची देयकेसुद्धा सामान्य दराने काढायची होती. लेखापरीक्षण तपासणीत असे निदर्शनास आले होते की, २० वखार केंद्रांनी रुपये १.६६ कोटी रकमेची ६८ मासिक देयके काढलीच नव्हती. तसेच १० ते १९ वखार केंद्रांनी अतिरिक्त साठी ठेवलेल्याची मासिक देयके १ ते ३३ महिने विलंबाने पाठविली होती. वखार केंद्राकडून साठवणूक आकाराबाबत मासिक माहिती मुख्य कार्यालयात जरी प्राप्त होत होती, तरी त्यांच्या स्तरावर मासिक देयके पाठविण्यास होणारा विलंब टाळण्याकरिता सुधारात्मक

उपाययोजना करण्यात आली नव्हती. व ते संनियंत्रण अभावाचे निदर्शक होते. व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की, एफसीआयकडून अतिरिक्त साठ्याचे परिमाण किती होते हे कळविण्यास विलंब करण्यात आल्यामुळे त्याबाबतची देयके तयार करून पाठविण्यास विलंब होत होता. हे उत्तर वस्तुस्थितीशी विसंगत आहे, कारण गोदामातील आरक्षणाबद्दल सुरुवातीलाच कळविण्यात आलेले होते. व झालेला विलंब आरक्षण कालावधी नंतरच्या पुढील मुदतीच्या मासिक देयकासंबंधी होता

५.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, याबाबत सादर करण्यात येते की, वखार भाडे वसूल करण्यासाठी तीन महिन्यांच्या मुदतीनंतर शिल्लक असलेल्या मालाची विल्हेवाट लावण्यासाठी वखार कायद्याप्रमाणे पद्धत विहित करण्यात आलेली आहे. त्या पद्धतीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येते. तीन महिन्यांनी भाडे वसूल करण्याचे प्रयत्नाबाबत उद्भवणाऱ्या अडचणींचे कारण समर्थनीय नसल्याचा उल्लेख केलेला आहे, कारण महामंडळाने साठवणूक भाडे वेळेवर वसूल करण्याच्या सुयोग्य व प्रभावी कार्यपद्धतीबाबत खात्री करून घेतलेली नसल्याचा उल्लेख केला आहे.

- याबाबत सादर करण्यात येते की, महामंडळाने सर्व स्त्रोत/पर्यायांचा सुयोग्य पध्दतीने वापर केला असून, ठेवीदारांशी जास्त कडक पद्धतीने वागल्यास ते नंतर माल गोदामात ठेवण्यास तयार होत नाहीत. त्यांचे म्हणणे असे आहे की, " जेव्हा साठवणूक भाड्यापेक्षा काही पटीने मालाची किंमत जास्त असल्यामुळे साठवणूक भाडे अगोदर घेण्याची आवश्यकता नाही. सदर माल उचलताना होणाऱ्या साठवणूक भाड्याची अदायगी करण्यात येईल " व तसे महामंडळ वसूलही करीत आहे. शिवाय मालाच्या वखार पावतीवर बँकेकडून कर्ज सुद्धा घेतले जात आहे, त्यामुळे वखार भाड्याची वसुली बँकेचे कर्ज परतफेड झाल्यानंतरच व्यावहारिक पद्धतीने वखार भाड्याची अदायगी मालाची जावक घेते वेळी केली जात आहे. तसेच वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन ॲक्ट, १९६२ या पार्लमेंट ॲक्टखाली वखार पावतीच्या निर्मितीचा उद्देश सुद्धा तसाच आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत चांगल्या व योग्य पद्धतीने मिळेपर्यंत साठवणूक सोय उपलब्ध करून देणे व त्यामुळे शेतकऱ्यांकडून चांगले भाव मिळाल्यानंतर वखार पावतीवरील ठेवलेल्या मालाची जावक घेऊन वखार भाड्याची अदायगी केली जात आहे.
- भारतीय खाद्य निगम व इतर बिले याबाबत व्यवस्थापनाने म्हटले होते की, (जुलै, २००६) भारतीय खाद्य निगमकडून बऱ्याच प्रकरणी आरक्षण मंजुरी उशिराने कळविण्यात आलेल्या आहेत. जर आरक्षण कालावधी सुरू होण्यापूर्वीच मंजुरी कळविली असती तर जादा साठ्याचे बिल तयार करण्यात होणाऱ्या विलंबाचा प्रश्नच उद्भवत नाही.

५.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

५.४ याप्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग, आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ९ जून,२०१५ रोजी कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी

यांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.१४ मध्ये " साठवण आकाराचा थकित " या आक्षेपासंदर्भात ज्या लोकांनी विशिष्ट कालावधीकरिता गोदामामध्ये माल ठेवला असता विहित कालावधी उलटल्यानंतरही मालाची उचल करीत नाहीत. अशा थकबाकीदारांविरुद्ध महामंडळ कोणत्या प्रकारची कारवाई करते किंवा त्यांना कोणत्या प्रकारे शास्ती लावण्यात येते, काही थकबाकीदारांकडून मूळ भाडयाचीही पूर्ण रक्कम वसूल न करता त्यांना त्यांचा माल उशिराने विना शास्ती हस्तांतरित केला जातो हे योग्य नाही. त्यामुळे वखार महामंडळाचे आर्थिक नुकसान होत आहे. एखाद्या थकबाकीदाराने विहित कालावधीमध्ये मालाची उचल न केल्यास त्याचा माल लिलावामध्ये विकून त्यातून गोदामाचे भाडे व शास्तीची रक्कम वजा करण्याची मुभा गोदाम प्रशासनाला नियमानुसार आहे काय या समितीच्या प्रश्नाबाबत विभागीय सचिवांनी असे विदित केले की लोक कस्टम डयूटी भरून त्यांच्या मालाला चांगल्या भावाची बाजारपेठ मिळेपर्यंत गोदामामध्ये ठेवत असतात. संबंधित मालाला चांगला भाव मिळाल्यानंतर संबंधित माल ठेवणारे त्यांच्या मालाची उचल करतात. या कस्टमच्या मालाकरिता ते स्वतः कस्टम डयूटी भरत असतात, अशा परिस्थितीत त्यांनी गोदामामध्ये माल ठेवला असता, वेळेवर त्याची उचल केली नाही तरी त्यांच्याकडून योग्य ते भाडे व नियमानुसार शास्ती हस्तांतरणाच्या वेळी वसूल केली जाते या विभागीय सचिवांच्या खुलाशावर समितीने थकबाकीदारांनी त्यांचा माल विहित वेळेनंतरही गोदामामध्ये ठेवल्यास गोदामाची भोगवटा जागा व्यापून राहिल्यामुळे नवीन माल भरण्याकरिता जागा राहत नाही. अशा परिस्थितीत माल, जागा, भाडे या तिनही बाबींचे नुकसान होते. वखार महामंडळाने थकित वसुलीबाबत व थकबाकीदारांच्या मालाच्या हस्तांतरण, शास्तीबाबत गाफील राहता कामा नये. यामुळे शासनाचा महसूल बुडतो. तसेच थकबाकीदारांच्या मालाचे विहित कालावधी उलटून गेल्यानंतर भाडे व शास्ती वसुलीकरिता लिलाव केल्यास त्यातून भाडे व शास्ती यांची रक्कम वसूल होत नाही. अशा परिस्थितीत वखार महामंडळाचे नुकसान होते. मूळ भाडेही जर मालाच्या विक्रीतून वसूल झाले नाही आणि थकबाकीदाराने भाडे व शास्ती भरण्यास टाळाटाळ केली तर वखार महामंडळाचे आर्थिक नुकसान होते याबाबत विचारले असता आता राज्यातील वखार महामंडळांच्या गोदामांमध्ये ९० टक्के संगणकीकरणाचे काम पूर्ण झालेले असून काही ठिकाणी संगणकीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. आता संगणकीकरणाच्या माध्यमातून कोणत्या गोदामामध्ये कोणता माल किती कालावधीकरिता ठेवलेला आहे, याची माहिती एकाच ठिकाणी संगणकावर प्राप्त होऊ शकते. कोणत्या ठिकाणचा माल विहित कालावधीनंतरही उचलला गेला नाही, याचीही माहिती प्राप्त होत असल्याने त्यासंबंधी ताबडतोब कारवाई करणे सुकर झालेले आहे. परंतु कधी कधी वखार महामंडळाला आपले ग्राहक टिकविण्याकरिता व ख्याती जपण्याकरिता खते व तत्सम माल विहित कालावधीनंतरही ठेवणे भाग पडते. माल ठेवणाऱ्याला जर सहकार्य केले नाही तर पुढील वेळी तो त्याचा माल ठेवण्याकरिता खाजगी गोदामांची मदत घेऊ शकतो. महामंडळाने ग्राहक व धंदा टिकविण्याकरिता काही वेळा वाणिज्यिक दृष्टीकोन ठेवण्याचा निर्णय घेतला होता काही नियमित व नामांकित ग्राहकांचा चांगला माल विहित कालावधीनंतरही त्यांच्या सोयीकरिता गोदामात ठेवला जातो. नंतर ज्यावेळी ते त्यांच्या मालाची उचल करतात, त्यावेळी ते

शास्तीसहित भाडयाची रक्कम भरतात. या दृष्टीकोनामुळे गोदामांचे ग्राहक, धंदा टिकून राहतो व शास्तीसहित मूळ भाडे वसूल झाल्यामुळे आर्थिक नुकसानही टळते. या विभागीय सचिवांच्या खुलाशावर समितीने विचारले की, ६७.१७ लाख रुपयांपैकी २२ लाख रुपये सोलापूर जिल्हा घोंगडी उत्पादक संघाकडे बाकी होते. या पैशांची वसुली झाली का अशी पृच्छा केली असता त्याबाबत विभागीय सचिवांनी ७१ लाख रुपये एकूण रक्कम होती, त्यापैकी आजमितीस ३२ लाख रुपये थकित आहेत. उर्वरित ४४ लाख रुपये वसूल झालेले आहेत. तसेच विभागीय प्रतिनिधींनी साखर कारखान्याकडे तीन लाख रुपयांचे रक्कम थकबाकी आहे. साखर कारखान्याने काही गोडाऊन्स आरक्षित केली होती, परंतु साखरेचे भाव खाली आल्यामुळे त्यांनी माल गोदामामध्ये आणला नाही त्यामुळे त्यांच्याकडून आकाराची रक्कम वसूल करता आली नाही. एक कंपनी बंद झाल्यामुळे एक लाख रुपये त्यांच्याकडे बाकी आहेत. २२ लाख रुपये सोलापूर जिल्हा घोंगडी उत्पादक संघाकडे बाकी आहेत. त्यांची मालमत्ता मूल्यमापन शोध करण्याचे काम सुरू असून त्यांना नोटीस काढलेली आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, गोडाऊन्सच्या भाडे वसुलीसाठी कोर्टात केस दाखल करण्यात येईल.

**५.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.१४ मध्ये " साठवण आकाराचा थकित " याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीस साक्ष घेताना असे दिसून आले की, **ज्या लोकांनी विशिष्ट कालावधीकरिता गोदामामध्ये माल ठेवला असता तो विहित कालावधी उलटल्यानंतरही मालाची उचल केलेली नसल्याने अशा थकबाकीदारांविरुद्ध वखार महामंडळाने थकबाकी वसूल न करता तो माल हस्तांतरीत केल्यामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते तसेच जी थकबाकीची रक्कम आहे ती रक्कम पूर्णपणे वसूल होणे गरजेचे आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी.**

**सहा - शेतकऱ्यांना देण्यात आलेली वटाव सवलत :-**

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१५ " **शेतकऱ्यांना देण्यात आलेली वटाव सवलत** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, महामंडळ सर्व शेतकऱ्यांना साठवण आकारात २५/३५* टक्के इतकी वटाव सवलत देत असते. आणि एससी/एसटी शेतकऱ्यांना व ज्यांची दहा एकरपेक्षा कमी जमीन असेल अशांना ५० टक्के वटाव सवलत देते. अशा प्रकारची वटाव सवलत देताना उपभोक्ते शेतकरीच आहेत याची खात्री करून घेणे आवश्यक होते. तसेच जे उत्पादन मंडळाच्या गोदामात साठविले होते ते त्यांनी स्वतःच्या जमिनीवर उत्पादित केलेले होते. महामंडळाने सन २००१-२००५ या कालावधीत रुपये १.३९ कोटीची वटाव सवलत दिली होती.

१३ वखार केंद्रांनी शेतकऱ्यांना दिलेल्या वटाव सवलतीचा आढावा घेतला असता असे आढळून आले की, दहा केंद्रातील ९१ प्रकरणांत जमिनीची मालकी किंवा पीकाची नोंद साठविलेले अन्नधान्य हे त्या शेतकऱ्यांनी पिकविले होते की नाही याबाबतचा पुरेसा पुरावा वखार केंद्राच्या व्यवस्थापकांनी तपासला नव्हता. तसेच, अशा प्रकारच्या पुराव्यात पिकांची जी नोंद घेतली होती ही त्याप्रमाणात अन्नधान्ये साठविली नव्हती. ही बाब प्रादेशिक व्यवस्थापकांनी सुद्धा त्यांच्या नेहमीच्या भेटीच्या वेळी तपासली नव्हती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (मे, २००६) की, यापुढे दरात वटाव सवलत देतांना जमिनीची मालकी व काढलेल्या पिकांच्या नोंदीचे पुरावे तपासले जातील. यापूर्वी ही विहित पद्धत का अवलंबिण्यात आली नाही याबाबत उत्तरात काहीही म्हटले नव्हते.

**( * ८ ऑगस्ट, २००४ पासून ३५ टक्के इतका वाढविलेला. )**

६.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, याबाबत सादर करण्यात येते की, विहित पद्धतीचे अवलंबन पूर्वीपासूनच केले जात होते. मात्र ५ वर्षामध्ये ९१ प्रकरणात पुरेसा पुरावा नसल्याने, ऑडीट पॅरामध्ये विहित पद्धतीचा अवलंब केलेला नाही असे म्हटले, कारण इतर वखार केंद्रांचे ठिकाणी विहित पद्धत अवलंबविली आहे, मात्र ती व्यक्तिगत चूक असून विहित पद्धत अवलंबविण्याबाबत यापूर्वीसुध्दा तपासणी अधिकाऱ्यांकडून तपासले जात होते व ती पद्धत सर्व ठिकाणी अवलंबविली जात असून त्याबाबत सर्व संबंधित अधिकारी योग्य ती दक्षता घेत आहेत.

६.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

६.४ याप्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग, आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ९ जून,२०१५ रोजी कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.१५ मध्ये शेतकऱ्यांना देण्यात आलेली वटाव सवलत या आक्षेपासंदर्भात समितीने महामंडळ सर्व शेतकऱ्यांना २५ ते ३० टक्के रकमेची सवलत देते. अनुसूचित जाती/जमातीच्या शेतकऱ्यांना व ज्यांची दहा एकरापेक्षा कमी जमीन असेल अशांना ५० टक्के सवलत देते परंतु ती सत्यता पडताळणी होत नाही की तो शेतकरी आहे की व्यापारी, त्यामुळे व्यापारी शेतकऱ्यांच्या नावावर सवलत लाटू शकतो. त्याने सात-बाराचा उतारा दिलेला आहे की नाही, शेतकरी असल्याचे तहसीलदाराचे प्रमाणपत्र त्याच्याजवळ आहे की नाही, आतापर्यंत किती व्यापाऱ्यांनी याचा गैरफायदा घेतला शेतकऱ्यांच्या नावावर माल ठेवून ५० टक्के सूट घेतली तो शेतकरी नव्हता, हे नंतर लक्षात आले म्हणून यामध्ये सुधारणा करणेची आवश्यकता प्रतिपादन केली.

यासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी शासनाने सात बाराचा उतारा बंधनकारक केलेला आहे. शेतकऱ्याच्या उत्पादनाची सरासरी काढून तेवढ्याच मालाची त्याला साठवणूक करता येईल. याबाबतचे सविस्तर परिपत्रक महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना दिलेले आहे. आता गोडाऊनमध्ये जो माल ठेवला जातो त्याबाबतची माहिती ऑन लाईन मिळते. १४७ शेतकऱ्यांनी गोडाऊन्समध्ये माल ठेवला असेल तर त्याला वखार महामंडळ वखार पावती देते. ही पावती दिल्यानंतरच त्याला बँकेकडून कर्ज मिळते. महालेखाकार कार्यालयाने तपासणी केल्यानंतर शासनाने ही पद्धत सुरू केलेली आहे. सूट देण्याची पद्धत काही प्रकरणामध्ये असू शकते. कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांनी काळजी घेतलेली नसेल किंवा नोंद उपलब्ध आहे की नाही, हे पहावे लागेल. व्यापारी शेतकऱ्यांकडील माल घेऊन तो स्वच्छ करूनच काही दिवस गोडाऊन्समध्ये ठेवतात. प्रत्येक ठिकाणी बाजार भाव काय आहे याची माहिती आता बोर्डवर दिलेली असते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.३९ कोटी रुपयांच्या सवलतीबाबत विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, महालेखापाल यांनी केवळ १३ वखार महामंडळाची तपासणी करून ९१ प्रकरणांसंदर्भात आक्षेप नोंदविले. या आक्षेपांमध्ये काही प्रकरणात सात बाराचा उतारा होता, परंतु ८ (अ), तहसीलदारांकडून आणेवारी अशा कागदपत्रांची पूर्तता केलेली नव्हती, या प्रकरणांची तपासणी करून ५० टक्के प्रकरणांत सूट देण्यात आलेली आहे. काही प्रकरणांमध्ये कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांची चूक झालेली आहे. त्यांची चौकशी करून संबंधितांना जबाबदार धरून काही रक्कम त्यांच्या पगारातून तर काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांच्या सेवानिवृत्तीच्या लाभातून काही रक्कम वसूल केलेली आहे. शेतकऱ्यांना १.३९ कोटी रुपयांची सवलत दिलेली आहे. १५० पैकी १३ वखार केंद्राची तपासणी केली असता ९१ प्रकरणे समोर आली आहेत. यातील निम्म्या प्रकरणामध्ये कागदपत्रांची पूर्तता नव्हती म्हणून ज्या अधिकाऱ्यांनी सवलती दिल्या त्यांची नावे तसेच किती रकमेची वसुली झाली त्याची माहिती समितीला द्यावी असे सूचित करण्यात आले.

**६.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.१५ मध्ये " शेतकऱ्यांना देण्यात आलेली वटाव सवलत " याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना असे दिसून आले की, वखार महामंडळ सर्व शेतकऱ्यांना २५ ते ३० टक्के रकमेची सवलत देते. व अनुसूचित जाती/जमातीच्या शेतकऱ्यांना ज्यांची जमीन दहा एकरपेक्षा कमी असेल अशा शेतकऱ्यांना ५० टक्के सवलत वखार महामंडळ देते सदर सवलतीचा लाभ संबंधित शेतकऱ्यांना देण्यापूर्वी वखार महामंडळाने याबाबत सविस्तर परिपत्रक काढले आहे त्यानुसार शेतकऱ्याचा ७/१२ उतारा, ८ (अ), शेतकरी असल्याचे तहसिलदाकडून मिळणारे प्रमाणपत्र, तहसिलदारांकडून मिळणारी आणेवारी, इत्यादी कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे, तथापि १३ वखार केंद्रांची तपासणी केली असता ९१ प्रकरणासंदर्भात आक्षेप नोंदविण्यात आले असून या आक्षेपांमध्ये काही प्रकरणात ७/१२ चा उतारा होता परंतु ८ (अ) व तहसिलदाराची आणेवारी या कागदपत्रांची पूर्तता केलेली नव्हती काही

प्रकरणांमध्ये कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांची चूक झालेली आहे ही बाब अतिशय गंभीर आहे **याप्रकरणी महामंडळाने सखोल चौकशी करून कागदपत्रांची पूर्तता न करता सवलत देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरूद्ध कोणती दंडात्मक कारवाई केली व झालेले आर्थिक नुकसानाची भरपाई व्हावी म्हणून कोणती उपाययोजना केली आहे तसेच भविष्यात असे प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी कोणती उपाययोजना केली आहे याबाबतचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीस सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**सात - वखारीची देखभाल :-**

**साठवणुकीतील तूट (अतिरिक्त साठवणूक तुटीमुळे एफसीआयने रुपये ७१.५९ लाखांची रक्कम रोखून ठेवली होती).**

**७.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१७ " **वखारीची देखभाल** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले की, भारतीय अन्न महामंडळ, हे अन्नधान्य महामंडळाच्या वखारीत साठविते. हवेतील आर्द्रता व इतर कारणांकरीता ०.५ टक्के इतकी साठवणुकीतील तूट मान्य केलेली आहे. परंतु असे निदर्शनास आले की एक टक्क्यापेक्षा अधिक तूट असल्यामुळे अन्न महामंडळाने रुपये ७१.५९ लाखाची रक्कम रोखून ठेवली होती, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :—

| **वर्ष** | **प्रकरणाची संख्या** | **रक्कम (रुपये लाखात)** | **प्रत्यक्ष तुटीचे प्रमाण (टक्केवारीत)** |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ७ | ५.९५ | १ आणि ३.५ |
| २००२-०३ | १७ | ४०.९५ | १ आणि ८.७३ |
| २००३-०४ | १२ | १९.९४ | १ आणि ४.२५ |
| २००४-०५ | ४ | ४.७५ | १ आणि १.२६ |
| **एकूण** | **४०** | **७१.५९** | |

वरील तक्त्यावरूनच असे दिसून येते की, साठवण तुटीचे प्रमाण ८.७३ टक्के इतके जास्त होते. साठवणूक तूट विहित ०.५ टक्के या प्रमाणापेक्षा जास्त तूट गोदामातील साठ्याची देखभाल करण्यात काही कमतरता असल्याचे द्योतक आहे. विहित प्रमाणापेक्षा जास्त तूट असण्याची नोंदविलेली कारणे अशी होती की, अन्नधान्यात जास्त आर्द्रता असणे, दीर्घ साठवण काळ आणि वजन करण्याच्या प्रकारामधील फरकही होता. विहित प्रमाणापेक्षा साठवणुकीतील अतिरिक्त तुटीबाबत संचालक मंडळाला कळविण्यात आले नव्हते किंवा ही बाब एफसीआयकडे नेण्यात आली नव्हती.

व्यवस्थापनाने म्हटले होते (जुलै, २००६) की, एफसीआयकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल व अतिरिक्त साठवण तूट नियमित करण्यात येईल हे उत्तर समर्थनीय नाही. कारण यात अंतर्भूत

मुद्दा हा अतिरिक्त तूट नियमित करण्याचा नसून प्रमाणापेक्षा जास्त तूट का येते त्यांची कारणे तपासून त्याबाबत सुधारात्मक उपाय योजणे हा आहे.

**७.२** यासंदर्भात समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, याबाबत व्यवस्थापनाने म्हटले होते की, भारतीय खाद्य निगमकडे पाठपुरावा करण्यात येत आहे व अतिरिक्त तूट नियमित करण्यात येईल. याबाबत प्रमाणापेक्षा जास्त तूट का येते याबाबत तपासून सुधारणात्मक उपाययोजनेबाबत सूचना केली आहे. सुधारणात्मक उपाययोजनांपैकी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. अन्नधान्याची रेक माल धक्क्यावर लागल्यापासून ताबडतोब तपासणी पथकामार्फत तपासणी केली जात आहे.

२. सर्व संबंधित वे-ब्रीज इलेक्ट्रॉनिक व प्रिंटरसह संगणकीकृत करण्यात आले आहे.

३. भारतीय खाद्य निगमने त्यांचे सर्व २१ केंद्रांवर संगणकामार्फत जोडणी केली आहे व सर्व रेकचा डाटा संगणकीकृत करून त्यांचे मुख्यालय, दिल्ली पर्यंत संकलन केले जाते, त्यामुळे प्रत्येक स्टेजला मालाचे वजनावर निगराणी होण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

**७.३** याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**७.४** याप्रकरणी समितीला कृषी व पणन विभाग, आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ९ जून, २०१५ रोजी कृषी व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.१७ मध्ये वखारीची देखभाल या आक्षेपासंदर्भात भारतीय अन्न महामंडळाकडून १ हजार मेट्रिक टन माल पाठविला आहे, परंतु तो माल गोदामामध्ये आल्यावर ०.५ टक्के साठवणुकीतील तूट महामंडळ मान्य करीत आहे. मालाच्या या तुटीचे पैसे भारतीय अन्न महामंडळाकडून वसूल करायला पाहिजे. भारतीय अन्न महामंडळाने माल पाठविल्यानंतर गोदामांमध्ये उतरवित असताना मालाची मोजणी करणे आवश्यक होते. वखार महामंडळाने भाडे घेतेवेळी ०.५ टक्केपेक्षा जास्त तूट असल्यामुळे भारतीय अन्न महामंडळाकडून पैसे वसूल करावयास पाहिजे होते साठवणुकीतील तुटीच्या संदर्भातील माहिती देणेबाबत समितीने सूचित केले.

४० प्रकरणात ७१.५९ लाख रुपयांची रक्कम आहे. ३५ प्रकरणांमध्ये ६४ लाख २३ हजार ८३४ एवढी रक्कम आहे. त्यापैकी ५१ लाख २९ हजार ४३८ एवढ्या रकमेची तडजोड करूनच त्यांनी पैसे रिलीज केले होते. सद्य:स्थितीत विभागाकडून ५ प्रकरणांचा पाठपुरावा घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे असे विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले. यासर्व प्रकरणांमध्ये रुपये ६ लाख ६४ हजार एवढी रक्कम आहे. ३०४३ पैकी ११२ केसेस आहेत. त्यामध्ये ०.५ च्यावर तूट आहे. ४० पैकी ३५ केसेसमध्ये स्वीकृती दिलेली आहे. सद्य:स्थितीत ५ केसेसचा निर्णय प्रलंबित आहे. सन २००८ ते सन २०१२ मधील प्रकरणी एकूण १२ बैठका झालेल्या आहेत. २१८ प्रकरणे डिसाईड केलेली आहेत. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात ६५४

केसेस होत्या. ३९५ प्रकरणे काढून टाकण्यात आली आहेत. मालाच्या हानीसंदर्भात देशामध्ये प्रमाणकातील टक्केवारी ठरविण्यात आली आहे त्या प्रमाणकानुसार घट आल्यानंतर मान्य केले जाते. त्यावेळी भाड्यात कोणत्याही प्रकारची कपात केली जात नव्हती. वाहतूक कंत्राटदाराची गोदामावर जबाबदारी असते असे विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले.

०.५ पेक्षा अधिक घट होण्याची कारणे काय आहेत या महालेखाकार प्रतिनिधींच्या प्रश्नावर ज्या ठिकाणाहून माल येतो, त्या ठिकाणची नोंद विभागाकडे नसते. अमुक वजनाचा माल जर ८ टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पुढील योग्य ती कारवाई केली जाते. भारतीय अन्न महामंडळ धान्याच्या गोडाऊनमधून माल किती निघाला हे तरी या ठिकाणच्या व्यक्तीला समजण्याची गरज आहे, आणि ही जाणुनबूजन ठेवलेली तूट आहे किंवा कसे असे समितीने विचारले असता भारतीय अन्न महामंडळाकडून माल पाठविला जातो. त्यानंतर मालाचे वजन करून तो माल मालडब्यामध्ये भरला जातो. तेथून तो रेल्वेच्या रॅकमध्ये आणला जातो. त्यावेळी भारतीय अन्न महामंडळ आणि महामंडळाचे अधिकारी माल घेतात. त्यानंतर पुन्हा ८ कि.मी.च्या अंतरा नंतर पुन्हा एकदा त्या मालाचे वजन घेतले जाते. रेल्वेच्या वाहतुकीमध्ये नुकसान झाले तर त्यासंदर्भातील अहवाल भारतीय अन्न महामंडळाकडे पाठविला जातो. दोन्ही ठिकाणी वजन केले जाते. जर माल खराब असेल किंवा त्यात काही बदल केलेला असेल तर महामंडळ संबंधितांकडे इको रिपोर्ट सादर करते.

सन २००५ मध्ये फक्त २ प्रकरणांमध्ये २६ लक्ष रुपये रोखून ठेवले होते, त्याबाबत समितीने विचारणा केली असता खामगाव, जालना, परभणी आणि लोणंदमधील अशी एकूण ४ प्रकरणे सन १९९९ पासूनची आहेत. त्यावेळी वेळेत अहवाल सादर केला नाही या महालेखाकारांच्या हरकतीमुळे ती रक्कम रोखून ठेवण्यात आली होती. यासंदर्भात महामंडळाकडून पाठपुरावा केला जात आहे. सद्य:स्थितीत ती रक्कम महामंडळाला मिळालेली नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

२ प्रकरणांमध्ये २६ लक्ष रुपये रोखून ठेवले होते, भारतीय अन्न महामंडळाने किती प्रकरणे नियमित केलेली नाहीत त्याबाबत समितीस माहिती देतांना १५ वर्षात महामंडळाला १०७ कोटी रुपयांचा महसूल मिळालेला आहे. मुदत संपलेल्या बंध पत्राची थकित रक्कम ९ कोटी रुपये इतकी आहे. असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले. १८.२९ कोटी रुपये थकीत असण्याचे कारण आणि सद्य:स्थितीत किती रक्कम वसूल झाली आहे याबाबत समितीस सद्य:स्थितीत कोणतीही वसुली शिल्लक नाही. १२ प्रकरणात लिलाव रक्कम काढलेली आहे. कस्टमला जेवढे पैसे हवे होते, त्यापेक्षा ती रक्कम कमी आहे. म्हणजे ते पैसे कस्टमकडे गेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपण कस्टम विभागावर प्रेशर आणावे. कारण त्यांना घाई नाही परंतु आपली जागा अडली आहे. या संदर्भात चिंता व्यक्त करूनच महामंडळ मालाचा लिलाव करीत नाही आणि जागा देखील अडवून ठेवली आहे. महामंडळाने एक-दोन महिन्यात निर्णय घ्यावा अन्यथा शासनास वरिष्ठ पातळीवर निर्णय घ्यावा लागेल या समितीच्या म्हणण्यावर शासन त्यांच्या बरोबर सतत पत्रव्यवहार करते. ती सेंट्रल एजन्सी

असल्यामुळे त्यांच्यावर थोडासा वचक कमी आहे. त्यांचे अधिकारी असतात. कस्टम बॉन्ड त्यांच्या ताब्यात असल्यामुळे सर्व व्यवस्था ते पाहतात. राज्य शासनाचा त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू आहे. दिल्लीतील वरिष्ठ अधिकारी यांना तसे कळविण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी शेवटी समितीस सांगितले.

**७.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या कामकाजासंदर्भात सन २००५-०६ च्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ३.१७ मध्ये वखारीची देखभाल :- साठवणुकीतील तूट (अतिरिक्त साठवणूक तुटीमुळे एफसीआयने रुपये ७१.५९ लाखांची रक्कम रोखून ठेवली होती) याबाबत नोंदविलेल्या अभिप्रायावर समितीने साक्ष घेताना असे दिसून आले की, भारतीय अन्न महामंडळ, हे अन्नधान्य महामंडळाच्या वखारीत साठविते, हवेतील आर्द्रता व इतर कारणांकरिता ०.५ टक्के इतकी साठवणुकीतील तूट मान्य केलेली आहे परंतु एक टक्क्यापेक्षा अधिक तूट असल्यामुळे अन्न महामंडळाने सन २००१-०२ ते २००४-०५ या कालावधीतील एकूण रुपये ७१.५९ लाख एवढी रक्कम रोखून ठेवली होती व उक्त कालावधीतील साठवण तुटीचे प्रमाण ८.७३ टक्के इतके जास्त होते या तुटीसंदर्भात समितीच्या असे निदर्शनास आले की, ज्या ठिकाणाहून माल येतो त्याठिकाणच्या नोंदणी विभागाकडे पाठविण्यात आलेल्या मालाच्या वजनाची नोंद घेण्यात येत नाही त्यामुळे गोदामामधून किती माल निघाला हे त्याठिकाणच्या व्यक्तीला ज्ञात असणे आवश्यक आहे. **यासंदर्भात वखार महामंडळाने उपरोक्त बाब भारतीय अन्न महामंडळाच्या (एफसीआय) निदर्शनास आणून द्यावी जेणेकरून होणारी तूट टाळता येईल यासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व एफसीआयने रोखून ठेवलेल्या उर्वरित रकमेपैकी महामंडळास किती रुपये रक्कम तडजोड करून (सेटल) प्राप्त झाले आहेत. याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी तसेच १२ प्रकरणात लिलाव रक्कम काढलेली आहे कस्टम विभागाला जेवढे पैसे हवे होते त्यापेक्षा ती रक्कम कमी असल्यामुळे ते पैसे कस्टम विभागाकडे आहेत कस्टम विभागाला घाई नाही व कस्टम विभागाच्या मालाचा लिलाव न केल्यामुळे गोदामाची जागा अडली आहे याबाबत कस्टम विभागाला त्वरित कळविण्यात यावे तसेच वखार महामंडळास गोदाम बांधण्यासाठी जागा विकत घेणे परवडत नाही राज्य शासन वखार महामंडळास बाजारभावाप्रमाणे जमीन देते. परंतु महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या राज्यामध्ये अनेक ठिकाणी पडीक जागा आहेत ज्याचा शासनाला उपयोग होत नाही त्या जागा वखार महामंडळाच्या उपयोगाच्या असल्यास त्या जागा वखार महामंडळाला नाममात्र दराने द्याव्यात यामुळे वखार महामंडळाचा हेतू साध्य होईल अशी समिती शिफारस करीत आहे.**

*******

# बैठकीचे परिशिष्ट

**सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०१३ रोजी विधान भवन, (कक्ष क्र. १९०१), मुंबई येथे दुपारी २-०० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.**

**उपस्थिती**

(१) डॉ. कल्याण काळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(३) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.
(४) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.
(५) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(६) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(७) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(१०) श्रीमती अलका देसाई, वि.प.स.
(११) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव
श्री. संतोष पराडकर, अवर सचिव

**महालेखाकार कार्यालय.**

श्रीमती पूनम पांडे, प्रधान महालेखाकार
श्री. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

(१) डॉ. सुधीर गोयल, अपर मुख्य सचिव, सहकार व पणन विभाग
(२) श्री. भोसले, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, वखार महामंडळ

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक ९ जून २०१५ रोजी विधान भवन, (कक्ष क्रमांक ८०१), मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.**

**उपस्थिती**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. भीमराव धोंडे, वि.स.स.

(३) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(४) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजन साळवी, वि.स.स.

(६) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

(७) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(८) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

(९) ॲड. अनिल परब, वि.प.स.

(१०) श्रीमती दीप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. राजेश तारवी, उप सचिव.

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्री. रविकिरण उबाळे, उप महालेखाकार

(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

डॉ. सुधीरकुमार गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई.

श्री. शिवदास, सह सचिव, सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**

श्री. विश्वास भोसले, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, .

श्री. सुधाकर देशमुख, सह व्यवस्थापकीय संचालक तथा सचिव, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

श्री. अविनाश पांडे, वरिष्ठ व्यवस्थापक, वखार महामंडळ

श्री. डी. एन. आंद्रे, व्यवस्थापक, वखार महामंडळ

श्री. ए. एन. ननावरे, व्यवस्थापक.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-०६ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य वरवाट महामंडळ " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक गुरुवार, दिनांक २३ जुलै २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—**

**उपस्थिती**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
(३) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(४) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(५) श्री. आकाश फुंडकर, वि.स.स.
(६) श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
(७) श्री. अमित साटम, वि.स.स.
(८) श्री. राजन साळवी, वि.स.स.
(९) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(१०) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.
(११) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(१२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(१३) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.
(१४) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(२) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई